**मजकुर :—**

दिनांक ०३/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " माहे जुलै —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुलै —२०२३

| | | |
|---|---|---|
| **०३** | **अंधेरी पोलीस ठाणे, परिमंडळ —१०, मुंबई** | **गु.र.क्र. ३८२/२०२३ कलम ४५७, ३८० भादविसं** |

**—: " रात्रौ घरफोडी ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयात दिनांक २२/०७/२०२३ रोजी रात्री ०८.०० ते दिनांक २३/०७/२०२३ रोजीच्या सकाळी ०५.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी संजय नॅन्सी शहा, वय ४९ वर्षे यांच्या अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पुर्व, मुंबई येथील संदिप इंटरप्रायजेस शॉप, या प्लायवुडच्या दुकानातुन कोणातीरी अज्ञात इसमाने शटरचे दोन्ही लॉक तोडुन दुकानातील रोख रक्कम २२,०००/— चोरी केली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | संजय नॅन्सी शहा, वय ४९ वर्षे |
| चोरीस गेलेला माल | :— | रोख रक्कम २२,०००/— |
| हस्तगत मालमत्ता | :— | १) ८,५३०/— किमतीच्या भारतीय चलनातील रू ५००/ १००/१० रू दराच्या नोटा<br>२) एकुण अंदाजे किंमत ४८,५००/— किमतीचे ०८ मोबाईल<br>३) एकुण ४३०००/— किमतीचे ०२ लॅपटॉप<br>एकुण १,०००३०/— किमतीचा मुद्देमाल |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) दावुद मुशी बेग वय २६ वर्षे<br>२) शमशुल नजीर खान वय ३८ वर्षे<br>अटक दिनांक — २७/०७/२०२३ रोजी |

**तपास कौशल्य :—**नमुद गुन्हयात गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उप.नि अमित यादव व पथक यांनी घटनास्थळी भेट देवुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रीक तपासात घटनास्थळावरील तसेच सरकारी सी.सी.टि.व्हि कॅमेरांच्या आधारे तपास केला तपासादरम्यान तपासी पथकाने एकुण २०० पेक्षा जास्त कॅमेरे तपासले.

तांत्रीक तपासात गुन्हयाशी संबधीत संशयीत इसम १) दावुद मुशी बेग वय २६ वर्षे २) शमशुल नजीर खान वय ३८ वर्षे यांची नावे निष्पन्न झाली. नमुद पाहिजे आरेपी हे पुष्पक इक्सप्रेस या रेल्वेन लखनऊ राज्य उत्तरप्रदेश येथे जात असल्याची खात्रीलायक माहीती मिळाली. तात्काळ तपासी पथकाने जी.आर.पी व आर.पी.एफ यांचे मदतीने नमुद संशयीत इसमांचा मागोवा घेवून त्यांस स्थानिक आर.पी.एफ यांचे मदतीने झांसी रेल्वे स्थानकात ताब्यात घेतले.

नमुद संशयीत इसमाची अंगझडती घेवून पंचनामा करण्यात आला. नमुद अंगझडतीत त्याचे जवळून घरफोडी करण्याकरीत वापरलली हत्यारे कटावणी व स्क्रूड्रायवर, तसेच नमुद गुन्हयात चोरी केलेली रोख रक्कम ८,४४०/— व, वेगवेगळया कंपनिचे एकुण ८ मोबाईल फोन, दोन लॅपटॉप. असे एकुण १,०००३०/— किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान आरोपतांविरूध्द दाखल असलेल्या साकिनाका पो.ठाणे गु.र.क्र ७१०/२३ कलम ४५७, ४५४, ३८० भा.द.वि २) पायधुनी पो.ठाणे गु.र.क्र १३०/२३ कलम ४५७, ३८० भा.द.वि या गुन्हयांचीसुध्दा उकल केली आहे.

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. संताजी घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. बालाजी दहीफळे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरीक्षक | श्री. अमित यादव | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.क्र. ०३—२९४ | श्री. मारूती सुरनर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.शि.क्र. ०७—१०१९ | श्री. अविनाश जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र ०७—१४७६ | श्री. दत्तात्रय बाबर | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि क्र ०३—१२२३ | श्री. प्रविण कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र १३—०२८६ | श्री. केतन पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र १३—०१०० | श्री. वंसत अशोक नरबट | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र ११—२२५७ | श्री. दत्ता टरके | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक ०४/१०/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे जुलै —२०२३ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुलै— २०२३

| | | |
|---|---|---|
| **०१** | **आझाद मैदान पोलीस ठाणे, परिमंडळ—०१, मुंबई** | **गु.र.क्र. ११४/१८, कलम ३०२, ३७७ भादवि** |

**—: ‘‘ अनैसर्गिक संभोग करुन खुन ’’:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील बळीत विक्रम रखमा निनामा, वय २३ वर्षे, यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून दिनांक २८/०४/२०१८ रोजी सकाळी ०५:३० ते ०५:४५ वाजताचे दरम्यान आयकर भवन, बेस्ट बसस्टॉप जवळ, एम. के रोड, मुंबई या ठिकाणी त्याचे डोक्यात फरशीचे तुकडे व पेवर ब्लॉकने आघात करून त्याचा खुन केला. त्यानंतर त्याचेवर अनैसर्गिक संभोग करून पळून गेला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. गोपालसिंग नरसिंग राजपुत वय ३६ वर्षे |
| बळीत | :— | — |
| निकाल दिनांक | :— | दि. ०७/०७/२०२३ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | विजयन मुनियास्वामी थेवर उर्फ मुतुस्वामी रामास्वामी कोणार वय ६५ दिनांक २९/०४/२०१८ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात मा.न्यायालयाने आरोपीतास दोषी ठरवुन आजन्म कारावास व रू. ५०००/— दंड व दंड न भरल्यास तिन महिने कारावासअशी शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हा घडल्यानंतर गुन्हयातील आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता. तपासी अधिकारी पो.नि. सुभाष बोराटे, व पथक यांनी घटनास्थळावरील सी.सी.टि.व्हि. फुटेज व बातमीदार यांचे मार्फतीने आरोपीताचा शोध घेवून त्यास अटक केली. तसेच आरोपीचा गुन्हयातील सहभाग निषपन्न केला व गुन्हयाचा तपास पुर्ण करून विहीत वेळेत दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले.

आरोपपत्र दाखल केल्यानंतर मा. न्यायालयात खटला सुरू असताना आरोपीताचा पूर्व गुन्हेगारी इतिहास तपासामध्ये सादर केला. न्यायालयीन कामकाजचे वेळी पंच, साक्षीदार यांच्याकडून प्रभावी साक्ष देणेसाठी मेहनत घेवून त्यांच्याकडून तयारी करुन घेतली. तसेच साक्षीदार डॉक्टर, यांची आरोपीविरूध्द मा.न्यायालयातील साक्ष नोंदवली व वैदयकीय अहवाल, सी.ए.रिपोर्ट तसेच मुद्देमाल विहीत वेळेत मा.न्यायालयात सादर केले.

खटला सुरू असतांना सरकारी अभियोक्ता यांचे सतत संपर्कात राहुन, त्यांना खटल्याच्या अनुषंगाने रिपोर्ट तसेच माहिती पुरवुन, सदरचा खटला सुयोग्य रितीने चालविणेकामी मदत केली. परिणामी मा. न्यायालयाने सदर गुन्हयात आरोपीतास दोषी ठरवुन आजन्म कारावास व रू. ५०००/— दंड व दंड न भरल्यास तिन महिने कारावास अशी शिक्षा ठोठावलेली आहे. त्यामुळे जनसामान्यामध्ये पोलीस दलाची प्रतिमा उंचावण्यास मदत झालेली आहे.

आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.न्यायालयीन कामकाज पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्री.भूषण महादेव बेळणेकर | |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. सुभाष आनंदराव बोराट | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. प्रविण विश्वनाथ पावले, | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | श्री. जयेश जयंत कुलकर्णी | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | श्री. विजय दौलतराव पटेल | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहाय्यक फौजदार .क्र. २५९३५ | श्री. मोहन मारूती कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.०३१०७७ | श्री. योगेश कुंडलीक यादव | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.शि.क्र. ०६१७९८ | श्री. सचिन अशोक उबाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.शि.क्र.१४११०८ | श्री. शरद गंगाराम चव्हाण | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| **०२** | **पवई पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई** | **गु.र.क्र.५६५/२०१३, कलम ३०७, २२४, ३५३, ३३२, ५०४,५०६, भादवि सह प्रिव्हेशन ऑफ डॅमेज टु पब्लीक प्रॉपर्टी ॲक्ट १९८४ कलम ३(२) (अ)** |

**—: ''सरकारी कामात अडथळा आणून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न '':—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील अटक आरोपी जुबेर करीमुल्ली खान वय ३१ वर्षे, याने पोलीस ठाण्यामधील निगराणी कक्षातील खिडकीतील काच फोडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान केले. तसेच फुटलेल्या काचेच्या तुकडयाने गुन्हयातील फिर्यादी ठाणे अंमलदार कर्तव्य बजावणारे पोलीस उप निरीक्षक, श्री सुशिलकुमार अशोक भोसले ३० वर्षे, यांचे मानेवर वार करण्याचा प्रयत्न केला. तसेच साक्षिदार चंद्रकांत शाहुराव नवगिरे (पो.ह.क्रं. २८२५२), यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आणि अटकेतुन पळुन गेला. म्हणुन गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री सुशिलकुमार अशोक भोसले ३० वर्षे, |
| बळीत | :— | १) सुशिलकुमार अशोक भोसले (पोउनि)<br>२) चंद्रकांत शाहुराव नवगिरे, (पो.ह.) |
| निकाल दिनांक | :— | दि. २७/०७/२०२३ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | जुबेर करीमुल्ली खान, वय ३१ वर्षे,<br>दिनांक १६/१०/२०१३ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात सार्वजनिक मालमत्ता संरक्षण कायदा १९८४ चा गुन्हा केल्याचे सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवुन त्याने २० महिने उपभोगलेली सजा व दाखल गुन्हयाच्या प्रत्येक कलमान्वये ४५००/— रुपये द्रव्यदंड अशी शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमूद गुन्हयातील तपासी अधिकारी पो.नि. दत्तात्रय गिरप, यांनी गुन्हयाच्या कागदपत्राची व्यवस्थितरित्या जुळवा जुळव केली. तसेच गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी साक्षिदार, अप्रत्यदर्शी साक्षिदार यांचे योग्य प्रकारे रितसर जबाब नोदविले. विहीत वेळेत मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. तसेच पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गुन्हयाच्या सुनावणीच्या वेळी कोर्ट कारकुन, व संमन्स वॉरन्ट अंमलदार यांना व्यवस्थित मार्गदर्शन केले. कोर्ट कारकुन व समन्स वॉरट बजावणी करणारे अंमलदार यांनी यातील साक्षिदार व पंच यांना जबाबबाबत मार्गदर्शन केले. तसेच वेळच्या वेळी कोर्टात कागदपत्रे व अहवाल सादर केल्याने आरोपीस शिक्षा झाली आहे.

पवई पोलीस ठाणे, मुंबई. न्यायालयीन कामकाज पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. बुधन पांडुरंग सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. दत्ताराम विठ्ठल गिरप | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | स्हाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. सुशिलकुमार अशोक भोसले | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरिक्षक | श्री. एस.एन कंठ | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | स.पो.उप.नि क्र २८२५१ | श्री.चंद्रकान्त शाहुराव नगगिरे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह. क्र.२४९४९ | श्री. गजानन बाबुराव देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह. क्र .०३.७४३ | श्री. संदीप रघुनाथ शिखरे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह. क्र . ३०९९१ | श्री. लक्ष्मण दत्तात्रय अडांगळे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र. ३३२११ | श्री.नरेश वामन वेगुर्लीकर | |
| १० | पो.शि.क्रं. ११.०९४२ | श्री. निवुत्ती रामकृष्ण पवार | प्रशस्तीपत्रक |

**टिप:—** वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, अंधेरी,पोलीस ठाणे, मुंबई Best Detection of the Month July– 2023 या करीता तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे व आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई यांना Best Conviction of the July – 2023 या करीता निवड झाल्यामुळे कळविण्यात येते की, राज्य स्तरावर प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु. अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | Property offence बाबतीत a) गेलेला माल b) जप्त/हस्तगत केलेला माल | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे,<br>a) घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | Inquest पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | DNA टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | Cyber Expert ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | FORENSIC Expert ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | Dog Squad ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | Fingerprint / Handwriting Expert ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी Portrait बाबत Expert ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2023